**ठळक बातम्या**

- राज्यात पावसाचा जोर कायम / अनेक ठिकाणी पूरसदृश स्थिती

- शेतजमिनीच्या वाटणीपत्राच्या दस्तासाठी लागणारं नोंदणी शुल्क माफ करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

- भारताला जगातल्या तीन प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक बनवण्यासाठी प्रथम श्रेणी आणि द्वितीय श्रेणीतल्या शहरांचा आर्थिक विकास अत्यंत महत्त्वाचा असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- प्राप्तिकर विवरण भरण्यासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**आणि**

- राष्ट्रपतींच्या हस्ते आज पद्म पुरस्कारांचं वितरण, अशोक सराफ, अश्विनी भिडे, अच्युत पालव यांना पुरस्कार प्रदान

**<><><><>**

राज्याच्या बहुतांश भागांत पावसाचा जोर कायम असून बऱ्याच ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं आहे. गेल्या चोवीस तासात कोकण, विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. पुढचे दोन दिवस कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

राजधानी मुंबईत आज सकाळपासून ढगाळ वातावरण असून अधूनमधून पावसाच्या हलक्या सरी येत आहेत.

**जालना** शहरासह जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी आज वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. घनसावंगी आणि अंबड तालुक्यात नदी नाल्यांना पूर आला आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी झाडांवर वीज कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत.

**बीड** जिल्ह्यातल्या सहा मंडळात अतिवृष्टी झाली आहे. बहुतांश नदी, नाल्यांना पुर आला असून बीड शहरातून वाहणारी बिंदुसरा नदी खळखळून वाहू लागली आहे.

**लातूर** शहर आणि जिल्ह्याच्या बहुतांश भागात आज पुन्हा एकदा मुसळधार पाऊस झाला. लातूर शहरातील अनेक रहिवासी वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचलं होतं.

**रत्नागिरी** जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून जोरदार पाऊस आहे आणि मे महिन्यात पावसामुळे एकंदर ३२ लाख रुपयांचं नुकसान झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनानं दिली आहे. जगबुडी नदीने काल धोक्याची पातळी ओलांडली होती, मात्र आज ही पाणी पातळी कमी झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. दरम्यान, लांज्यात भिंत कोसळून एका जणाचा मृत्यू झाला, तर इतर तिघे जखमी झाले, तर गुहागरमध्ये झाड कोसळून तीन जण जखमी झाले. रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूणमध्ये राष्ट्रीय आपत्ती निवारण दल अर्थात एनडीआरएफची एक तुकडी आज सकाळी दाखल झाली आहे.

**नाशिक** जिल्ह्यातील चार तालुक्यांनी पावसाची शंभरी पार केली आहे. इगतपुरी, पेठ सुरगाणा, दिंडोरी  या परिसरात पावसाचा जोर कायम आहे.

**परभणी** जिल्ह्यात पावसामुळे पपई आणि आंब्याच्या बागांचं मोठं नुकसान झालं. अनेक ठिकाणी झाडं पडल्यामुळे वीज पुरवठाही खंडित झाला होता.

**सांगली** शहरात दिवसभराच्या विश्रांतीनंतर सायंकाळी जोरदार पाऊस झाला. कृष्णा नदीच्या पाणलोट क्षेत्रात पडत असलेल्या पावसामुळे कृष्णा नदीची पाणी पातळीत वाढ झाली आहे.

हवामान विभागानं आज **कोकण** आणि **मध्य महाराष्ट्राला** रेड अलर्ट दिला आहे.

**<><><><>**

मुसळधार पावसामुळे राज्यातल्या शेतकऱ्यांच्या संकटात भर पडली आहे. अशावेळी सरकारने नुकसानग्रस्तांना एकरी वीस हजाराची मदत तातडीने द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र काँग्रेस समितीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. ते मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. भुयारी मेट्रो रेल्वेचा बोजवारा उडाल्याचं सांगत एमएमआरडीएच्या अहवालाला डावलून मेट्रोचा हट्ट पूर्ण केल्याबद्द्ल सपकाळ यांनी सरकारवर टीका केली. केंद्रीय गृहमंत्री महाराष्ट्रात असूनही या संकटावर काही बोलले नाहीत याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली.

**<><><><>**

शेतजमिनीच्या वाटणीपत्राच्या दस्तासाठी लागणारं नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय आज राज्याच्या मंत्रिमंडळानं घेतला. राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज मुंबई इथं झाली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. शेट्टी आयोगाच्या शिफारसींनुसार राज्यातल्या न्यायिक अधिकाऱ्यांसाठी टंकलेखकाची पदं निर्माण करण्यासाठीही मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेडमधल्या १ हजार ३५१ पदांच्या सुधारित आकृतीबंधाला मंजुरी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये अंशकालीन निदेशकांच्या नियुक्तीच्या सुधारित धोरणाला मान्यता, तसंच महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाच्या नागपूर इथल्या कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी मंजूर करण्यात आली आहे.

**<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज मुंबईत माधवबाग मंदिराच्या दीडशेव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भाग घेतला. या संस्थेत वेद, उपनिषद आणि गीतेचा अभ्यास करण्याचे कार्य करण्याबरोबरच आरोग्य सेवा पुरवण्याचे कार्य व्हावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**<><><><>**

स्वातंत्र्यवीर सावरकर हे व्यक्ती नसुन संस्था होती, असे उद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी काढले. मुंबईत सावरकर अभ्यास आणि संशोधन केंद्राचं उद्घाटन आ़ज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. सावरकरांच्या नावाने संशोधन केंद्र सुरू केल्याबद्दल त्यांनी मुंबई विद्य़ापीठाचं कौतुक केलं.

**<><><><>**

भारताला जगातल्या तीन प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक बनवण्यासाठी प्रथम श्रेणी आणि द्वितीय श्रेणीतल्या शहरांचा आर्थिक विकास अत्यंत महत्त्वाचा असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज गुजरातमधे गांधीनगर इथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. जगातल्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेच्या क्रमवारीत आपण ११व्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर झेप घेतली आहे, असंही मोदी यावेळी म्हणाले.

**होल्ड बाईट - नरेंद्र मोदी**

प्रधानमंत्री गुजरातच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी आज गांधीनगरमध्ये ऑपरेशन सिंदूर सन्मान यात्रेला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी त्यांच्यासोबत गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येनं उपस्थित असलेल्या स्थानिकांनी ऑपरेशन सिंदूरसाठीचे फलक आणि तिरंगा हातात घेऊन घोषणा दिल्या.

<><><><>

प्राप्तिकर विवरण भरण्यासाठीची मुदत केंद्रीय प्रत्यक्ष करमंडळाने १५ सप्टेंबरपर्यंत वाढवली आहे. विवरण पत्र भरण्यासाठीची अधिसूचना जाहीर करण्यात विलंब झाल्यामुळे ही मुदतवाढ देण्यात आली आहे. दरवर्षी ३१ जुलै पर्यंत करदात्यांना परताव्यासाठी विवरणपत्र भरता येतात. मात्र, यंदा १५ सप्टेंबरपर्यंत मुदत वाढवल्याची तपशीलवार अधिसूचना नंतर जाहीर होईल, असं सीबीडीटीच्या एक्स समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

<><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं पद्म सन्मान प्रदान करण्यात आले. या सोहळ्यात निवृत्त न्यायमूर्ती जगदीश सिंह खेहर यांना आणि कुमुदिनी लाखिया, डॉक्टर शारदा सिन्हा यांना मरणोत्तर पद्मविभूषण सन्मान प्रदान करण्यात आला. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत मनोहर जोशी यांना लोककार्यासाठी मरणोत्तर पद्मभूषण सन्मान प्रदान करण्यात आला. तर डॉ. विलास डांगरे, शास्त्रीय गायिका अश्विनी भिडे, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, सुलेखनकार अच्युत पालव यांना पद्मश्री सन्मानाने गौरवण्यात आलं.

या वर्षी सरकारनं १३९ पद्म पुरस्कारांची घोषणा केली असून त्यामध्ये ७ पद्म विभूषण, १९ पद्म भूषण आणि ११३ पद्मश्रीं चा समावेश आहे. पहिल्या समारंभात राष्ट्रपतींनी ७१ पद्म सन्मान प्रदान केले. आजच्या कार्यक्रमात ६८ मान्यवरांना पद्म सन्मान प्रदान करण्यात आले.

<><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ६२५ अंकाची घट झाली आणि तो ८१ हजार ५५२ अंकावर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही आज १७५ अंकांची घट होऊन तो २४ हजार ८२६ अंकांवर बंद झाला.

**<><><><>**

आय पी एल मध्ये आज लखनौ सुपर जायन्ट्स चा सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू बरोबर होणार आहे.  हा सामना आज संध्याकाळी साडे सात वाजता लखनौच्या एकाना स्टेडियमवर होणार आहे.

रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

//<><><><>//